# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
## शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


**तात्काळ/महत्वाचे**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१६/ ६६६७
दिनांक :- 27 OCT 2016

प्रति
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकीय/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव तंत्रशिक्षण मंडळ, प्रा. का. औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद,जालना,अंबड/हिंगोली/जितूर, नांदेड,बीड, उस्मानाबाद, पु.ला.शा.त.लातूर,निवासी महिला लातूर

**विषय** :- दि. २३-९-२०११ नंतर शासकीय सेवेत लागलेल्या गट- क संवर्गातील कर्मचा-यांना पायाभूत प्रशिक्षण देणेबाबत.

**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.टिआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ,दि.२३-९-२०११

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये दि.२३-९-२०११ नंतर शासकीय सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या गट-क संवर्गातील शासकीय कर्मचा-यांना १२ दिवसाचे पायाभूत प्रशिक्षण व दि. २३-९-२०११ पुर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ५ दिवसाचे उजळणी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यानुसार मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी नाथनगर, पैठण येथे या कार्यालयाकडून वेळोवेळी पायाभूत/उजळणी प्रशिक्षणासाठी गट-क संवर्गातील कर्मचा-यांना प्रतिनियुक्त करण्यात आलेले आहे. तथापि संस्थेतील कामाचे स्वरुप व कर्मचा-यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे काही कर्मचारी यांना प्रशिक्षणास हजर राहण्यासाठी संस्था/कार्यालयाकडून कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. त्यामुळे संबधित कर्मचारी प्रशिक्षणापासून वंचित राहिले आहेत.

त्यानुसार गट-क संवर्गातील दि.२३-९-२०११ नंतर शासकीय सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या व या कार्यालयाकडून मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी नाथनगर, पैठण येथे प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्त करण्याबाबतचे आदेश निर्गमीत झालेल्या परंतु प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त न करण्यात आलेल्या कर्मचा-यांची नावे दि.४-११-२०१६ पर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावीत. जेणेकरुन संबधितांना प्रशिणासाठी प्रतिनियुक्त करण्याबाबत आदेश निर्गमीत करणे शक्य होईल. संस्थेतील कर्मचारी प्रशिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे भविष्यात होणा-या सांभाव्य परिणामास संबधित कर्मचारी/ संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी .

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहिती व संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.

C/Astha -3/Cerculacer